माती घट्ट दाबावी. मुळांच्या परिसरात पोकळी राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. लागवडीनंतर लगेच रोपांना पाणी द्यावे.

**महाराष्ट्रात पपईची व्यापारी लागवड ३ हंगामात करतात :**

१) जून – जुलै (पावसाळ्यात), (२) सप्टेंबर – ऑक्टोबर (पावसाळ्याचे अखेरीस)

३) फेब्रुवारी – मार्च (वसंत ऋतू) या सर्व काळात हवामान सौम्य असते.

रोपे लावणीच्या हंगामाचा परिणाम झाडांचा आकार व झाडांच्या फळधारणेच्या क्षमतेवर होतो. व्दिलिंगी जातीचे एकच रोप एका खड्ड्यात लावावे लागते, तर एकलिंगी जातीची ३ रोप एका खड्ड्यात लावावी लागतात.

**मार्चनंतर लागवड करण्याचे तोटे :**

१. उष्माघाताने रोपे प्रचंड प्रमाणात दगावतात.

२. फळे मागणीच्या काळात कमी प्रमाणात काढणीला येतात.

३. उन्हाळ्यात फळे मोठ्या प्रमाणावर काढणीला येतात. या काळात उष्णता, तसेच पाण्याच्या ताणामुळे पानांचा काही प्रमाणात ऱ्हास होतो.

४. फळे अकाली पिकतातव बेचव लागतात. यामुळे व्यापारी माल घेण्यास टाळाटाळ करतात.

५. उन्हाळ्यात आंब्याचीही आवक सुरु होते, यामुळेही पपईची मागणी कमी होते.





प्रति : १००० म.फु.कृ.वि./विस्तार प्रकाशन/घडिपत्रिका/क्र.२१५१/२०१८

**आर्थिक सहाय्य**

**प्रकल्प संचालक**

कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा),
रेऊ नगर, नकाणे रोड,
धुळे - ४२४ ००५.
फोन - ०२५६२ (२२३००५)

# पपई पिकाचे लागवड तंत्रज्ञान




**लेखक**

**श्रीमती अमृता राऊत**
शास्त्रज्ञ (कृपअ)
कृषि विज्ञान केंद्र, धुळे

**श्री. रोहित व्हि. कडू**
शास्त्रज्ञ (उद्यानविद्यास)
कृषि विज्ञान केंद्र,धुळे

**संपादक**

**डॉ. किरण कोकाटे**
संचालक, विस्तार शिक्षण,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी



**प्रकाशक**

**डॉ. पंकज पाटील**
वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख
कृषि विज्ञान केंद्र, धुळे


प्रति : १००० म.फु.कृ.वि./विस्तार प्रकाशन/घडिपत्रिका/क्र.२१५१/२०१८


**महात्मा फुले कृषि विद्यापीठ**

**कृषि विज्ञान केंद्र,**

कृषि महाविद्यालय, धुळे-४२४००४
दुरध्वनी क्रं. (०२५६२)२३०३६२
संकेतस्थळ: http://www.kvkdhule.org
*E-mail* : pckvkdhule@gmail.com
pckvkdhule@rediffmail.com

# पपई पिकाचे लागवड तंत्रज्ञान

**निरोगी रोपासाठी महत्वाचे मुद्दे :**

- रोपवाटिकेच्या मातीचे फॉर्मेलिनच्या द्रावणाने (प्रमाण एक लि. पाण्यात २५ मि.लि. फॉर्मेलिन) निर्जंतुकीकरण करुन घ्यावे. फॉर्मेलिनचे द्रावण फवारल्यानंतर माती दोन दिवस पॉलिथिन पेपरने झाकून ठेवावी. त्यानंतर १५ दिवसांनी या मातीचा वापर सुरु करावा.
- खूप उष्ण तापमान असल्यास रोपे तयार करण्यासाठी ५० टक्के शेडनेटचा वापर करावा.
- रोपे सशक्त होण्यासाठी ३५ ते ४० दिवसानंतर दोन ते तीन दिवस शेडनेटच्या बाहेर ठेवावीत.
- पॉलिथिन पिशवीत बियाण्याची लागवड केल्यानंतर पहिले पाणी देतांना कॉपर ऑक्सीक्लोराईड (दोन ग्रॅम प्रति एक लीटर पाणी) त्यामध्ये मिसळावे.
- पिशव्या कायम वाफसा स्थितीत ठेवाव्यात. अंकुरणानंतर पाण्याचा कोणत्याही परिस्थितीत पाणी जास्त देऊ नये.
- रोपांची उगवण झाल्यानंतर १०-१५ दिवसांनी मेटॅलॅक्झीन अधिक मॅन्कोझेब हे संयुक्त बुरशीनाशक दोन ग्रॅम प्रति लीटरची आळवणी (ड्रेचिंग) करावी.
- रोपावस्थेत समतोल अन्नद्रव्य व्यवस्थापन असावे. नत्र खताचा अतिरेकी वापर रोपे नाजूक आणि रोग किडींना बळी पडण्यास वाव देतात.
- पपई पिकात फोरेटचा वापर टाळावा.

**बागेत लावणेसाठी योग्य रोपे :**

सुमारे ६० दिवसांनी रोप बागेत स्थलांतरासाठी तयार होतात. त्यावेळी रोपांची उंची साधारणपणे २२ से.मी.(९ इंच) असते. त्या वेळी प्रत्येक रोपाला ४-५ पाने असतात. रोपांची उंची २२ से.मी.पेक्षा अधिक असल्यास ती रोप स्थलांतराचा धक्का नीटपणे सहन करीत नाहीत. जास्त वायाच्या रोपांच्या मुळ्या वाफ्यातून काढतांना दुखावतात. (मुळ्या ठिसूळ असतात) त्यांचा बागेत जम बसण्यास उशीर लागतो. पानांची संख्या जास्त असलेली पपईची रोपे ठेंगणी असतात. आणि स्थलांकरिता चांगली असतात. पपईच्या रोपांना लांब, निमुळते जाड, मांसल व पांढरे सोटमूळ असते. सोटमुळाच्या वरच्या मांसल भागात सर्वात जास्त तंतुमय मुळ्या असतात. खालच्या मुळ्यांची संख्या कमी व धाग्यांप्रमाणे असतात. वरच्या मुळ्या झाडांच्या वाढीसाठी महत्वाच्या असतात. म्हणून ह्या तंतुमुळ्या रोपावर कायम असाव्या. या तंतुमय मुळ्यांची तूट झाल्यास रोपे स्थिरावण्यास विलंब होतो किंवा रोपांची मर होते.

**पपईची शेतामध्ये लागवडीचे अंतर व पध्दत :** महात्मा फुले कृषि विद्यापीठाने केलेल्या लागवडीच्या अंतराच्या दिर्घ संशोधनावर आधारित पुढील अंतर शिफारस केलेले आहे. या अंतरावर लागवड केल्यास, बागेमध्ये पुरेशी हवा खेळती राहून रोग व किडी आटोक्यात राहतात. तसेच झाडाची पाने सूर्यप्रकाशाला उघडी राहतात यामुळे वेळेत फूल व फलधारणा होऊन झाडाची वाढ सुदृढ व निरोगी होते.

**शिफारस केलेले लागवडीचे अंतर :** पपईची रोपे २.२५x२.२५ मीटर अंतरावर बागेत हमचौरस पध्दतीने लागवड करावी. ह्या अंतरावर, प्रति हेक्टरी झाडांची संख्या १९७५ झाडे लागवड होतात. तसेच २.५x२.० मिटर अंतरावर एकूण प्रति हेक्टरी २००० झाडे बसतात.

**पपई लागवडीसाठी खड्डा पध्दत :** खड्ड्याचा आकार अर्धा मीटर x अर्धा मीटर (१.५ x १.५ फुट) ठेवावा. खड्ड्याच्या वरच्या भागातील मातीमध्ये २० किलो शेणखत मिसळावे. प्रत्येक खड्ड्यात दीड किलो हाडांचा चुरा मिसळण्याची देखील शिफारस आहे. खड्डे खोदल्यानंतर ते काही आठवडे उघडे ठेवावे. त्यानंतर त्या खड्ड्यात वरील मिश्रण भरावे.

**पपई लागवडीसाठी उंच गादीवाफा पध्दत :** पावसाळ्यात सतत दोन-तीन दिवसांची पाऊस सुरु राहिल्यास पपई पिकात मर, मूळकूज व बुंधासड या बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव आढळून येतो. यासाठी अनेक शेतकरी रोपांची लागवड उंच गादीवाफ्यावर करतात. उंच गादीवाफे हे पोयटा, शेणखत, सिंगल सुपर फॉस्फेट, म्यूरेट ऑफ पोटॅश, निंबोळी पेंड मिश्रित करुन रोपलागवडीच्या १०-१२ दिवस आधी तयार ठेवावेत.

पपई पिकात पाण्याचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी ठिबक सिंचन पध्दत उपयुक्त सिध्द झालेली आहे. तसेच उंच गादीवाफ्यावर रोपांची लागवड करत असल्यास ठिबक सिंचनाचच पर्याय स्वीकारावा लागतो. गादीवाफा तयार झाल्यानंतर गादीवाफ्याच्या मध्य भागावर लॅटरलची मांडणी करावी. लागवडीच्या आठ ते दहा दिवस अगोदर गादीवाफा तयार झाल्यावर रोज नियमित ठिबक संच सुरु ठेवून बेड पूर्णपणे ओला होईल असे पहावे. यामुळे गादीवाफ्यात असणारी उष्णता पूर्णपणे निघून जाईल. सुरुवातीला पोयटा माती किंवा शेणखतामुळे संभाव्य उगवून येणाऱ्या तणांचे रोपलागवडी अगोदर नियंत्रण करता येईल. उन्हाळ्यात लॅटरल तापत असल्याने त्याच चटका लागून रोपे मरतात. त्यामुळे रोपांपासून लॅटरल तापत असल्याने त्याचा चटका लागून रोपे मरतात. त्यामुळे रोपांपासून लॅटरल किमान दहा से.मी. दूर ठेवावीत. एकदा लॅटरल ठेवल्यानंतर सतत हलवू नये. लॅटरलची शेवटची टोके खुंट्यांना बांधून घ्यावीत.

उंच गादी वाफा पध्दतीमध्ये दोन झाडांतील मशागत शक्य होत नाही. दोन ओळीतील अंतरामध्ये यांत्रिक पध्दतीने कुळवणी केली जाते. खरीप हंगामात पाऊस जास्त झाल्यास पायणी मुळ्यांच्या कक्षेत साठून न राहता ते दोन ओळीतील खोल जागेत साचते. यामुळे, झाडाच्या मुळ्या ह्या प्रत्यक्ष पाण्याच्या संपर्कात येत नाहीत. बेडवरील तणांचे नियंत्रण हे मजुरांकडून करावे लागते.

**शेतीमध्ये रोपे लावणीची वेळ :** रोपे लावणीच्या वेळी हवामान शक्यतो ढगाळ व थंड असावे. म्हणजे रोपांच्या कोवळ्या पानातून बाष्पीभवन कमी होते. रोपांची लावणी संध्याकाळी करावी. खड्ड्यातील माती ओली असावी. वाफ्यात रोप ज्या जमिनीच्या पातळीत होते त्याच पातळीत बागेतील रोपांची पातळी ठेवावी. सोटमूळ सरळ ठेवावे. पुनर्लागवडीसाठी रोपे किमान १२ से.मी. उंचीची सहा पानी, मजबूत दांडी असलेली निवडावीत. रोपे लावतांना बुंध्याच्या चौफेर